महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

क्र. पीआर-३/कृषी संजीवनी/ 00227 दिनांक : 3 JAN 2012

## वाणिज्य परिपत्रक क्र. १४३

**विषय : कृषी ग्राहकांकडील थकबाकी वसुलीकरिता कृषी संजीवनी योजना-२०११ ला दि.३१.०३.२०१२ पर्यंत मुदतवाढ.**

**संदर्भ :** १) वाणिज्य परिपत्रक क्र. १३४ दि. ०१.०४.२०११.
२) शासन निर्णय क्र. कृसंयो २०११/प्र.क्र.३७४/ऊर्जा-५ दिनांक ०६.०४.२०११.

वरील संदर्भिय वाणिज्य परिपत्रक क्र. १३४ व शासन निर्णय दि. ०६.०४.२०११ अन्वये महाराष्ट्र शासन व महावितरण कंपनीने कृषी ग्राहकांकरीता **"कृषी संजीवनी योजना-२०११"** ही योजना राबविण्यात आलेली आहे. सदर योजना शेतीपंपाच्या थकीत वीज देयकात सवलत देण्याविषयी आणि त्याचसोबत म.रा.वि.वि.कंपनीचा महसुल वाढविण्यासाठी राबविण्यात आली.

सदर योजना ०१.०४.२०११ ते ३१.१२.२०११ या कालावधीकरिता लागू होती. **"कृषी संजीवनी योजना-२०११"** चा लाभ जास्तीत जास्त कृषी ग्राहकांना घेता यावा यासाठी पुन्हा एक संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सक्षम अधिकारी यांनी या योजनेला ३१ मार्च २०१२ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत मान्यता दिलेली आहे.

या योजनेला मुदवाढ दिल्यामुळे नव्याने सहभागी होणा-या ग्राहकांना अथवा यापूर्वी सहभागी झालेल्या परंतु थकबाकीच्या रकमेचा भरणा योजनेच्या नियमानुसार करु न शकलेल्या कृषी ग्राहकांना निश्चित केलेल्या म्हणजेच डिसेंबर २०१० अखेरीस असलेल्या मुळ थकबाकीच्या रकमेचा भरणा १२% सवलतीच्या व्याजासहित योजनेच्या मुदतवाढ दिलेल्या कालावधीत म्हणजेच ३१ मार्च २०१२ पर्यंत करु शकतील.

योजनेच्या इतर अटी व शर्ती वाणिज्य परिपत्रक क्र. १३४ दि. ०१.०४.२०११ नुसार कायम असतील.

सर्व क्षेत्रिय अधिका-यांना कळविण्यात येते की, **"कृषी संजीवनी योजना-२०११"** ला ३१ मार्च २०१२ पर्यंत दिलेल्या मुदतवाढीबद्दल स्थानिक पातळीवर प्रसिध्दी देऊन योजना यशस्वीपणे अंमलात आणावी.

**संचालक (संचलन)**

**प्रत रवाना : प्रेक्षण यादीप्रमाणे**

D:\आरबीबी\KSY\KSY २०११_Circular_Extension.doc